Lyceum India Journal of Social Sciences || ISSN (Online): 3048-6513
Volume: 3 Issue: 3 || February 2026 (Special Issue 1) || DOI: 10.5281/zenodo.18848827

# प्रशासन आणि सुशासनातील सुधारणा: ई - शासन व डिजिटल प्रशासन आव्हाने व उपाय

**डॉ. ज्योत्स्ना शेषराव नरवडे**[1]

**गोषवारा :** माहिती आणि संप्रेषण तंत्रज्ञानातील प्रगतीमुळे सरकारमध्ये पारदर्शकता, कार्यक्षमता, जबाबदारी आणि नागरिकांना प्रदान करण्यात आलेल्या सर्व सेवांमध्ये कार्यक्षमता वाढवशविणे शक्य झाले आहे. येथे सरकार आणि शासन या दोन सज्ञांमध्ये फरक केला जातो कारण सरकारकडे एक संस्था म्हणून पाहिले जाते जे प्रशासनासाठी धोरणे, नियम आणि कायदे तयार करते तर प्रशासन ही शासनाच्या संपूर्ण प्रक्रियाची अंमलबजावणी करणारी यंत्रणा आहे. माहिती तंत्रज्ञानातील या सर्व गोष्टीमुळे भ्रष्टाचार कमी होतो ज्यामुळे पारदर्शकता वाढते जे नागरिक केंद्रित प्रशासन बनण्यास मदत करते. नागरिकांना सर्व प्रकारच्या सोय सुविधा पुरविण्यास आधुनिक सक्षम प्रशासकीय यंत्रणां महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडते. या सर्व तंत्रज्ञानातील गोष्टीने नागरी सुधारणांवर आणि त्यांच्या सक्षमीकरणावर अधिक लक्ष केंद्रित केलेले दिसून येते.

**प्रस्तावना :**

आधुनिक शासन व्यवस्था अधिक पारदर्शक कार्यक्षम लोकाभिमुख असे जबाबदार बनविणे ही प्रत्येक लोकशाही राष्ट्राची प्रमुख गरज बनली आहे. कोणत्याही देशाचा विकास जोवर सर्व समावेशक होत नाही तोवर त्याला अर्थ नाही. गरीबातल्या गरीब माणसापर्यंत विकासाचे लाभ पोहोचले पाहिजे यासाठीच उत्तम व पारदर्शक प्रशासनाची गरज असते. हे प्रशासन जितके कार्यक्षम, जबाबदार व दक्ष असेल तेवढा देशाचा विकास जलद होऊ शकेल. पारंपारिक प्रशासनामध्ये कामाचा विलंब, भ्रष्टाचार, जनतेशी संवाद, संवादाची कमतरता, कागदपत्रे प्रक्रिया अशा प्रकारच्या मर्यादा दिसून येतात. प्रशासन किंवा सरकार सामान्य माणसांपर्यंत पोहोचले पाहिजे हे प्रत्यक्षात येण्यासाठी आधुनिक माहिती तंत्रज्ञानाच्या माध्यमातून ई-शासन संकल्पना उदयास आली. प्रशासनात सुशासनातील तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर म्हणजेच ई-शासन, ई -गव्हर्नर आणि डिजिटल प्रशासन होय. प्रशासन आणि सुशासन म्हणजे शासनाच्या धोरणांची व निर्णयांची अंमलबजावणी करण्याची प्रक्रिया होय. यामध्ये कायद्याची अंमलबजावणी करणे, सेवा पुरविणे, संसाधनाचे व्यवस्थापन व लोकहिताची कामे करणे याचा समावेश होतो. तर सुशासन गुड

[1] सहाय्यक प्राध्यापक, लोकप्रशासन दगडोजीराव देशमुख कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, वाळूज, ता: गंगापूर, छत्रपती संभाजी नगर.

गव्हर्नर ही संकल्पना प्रशासनाच्या गुणवत्तेशी संबंधित आहे. बँकेनुसार सुशासनाची व्याख्या जिथे पारदर्शकता. उत्तरदायित्व कार्यक्षमता, सहभागीता, कायद्याचे राज्य, भ्रष्टाचार मुक्त व्यवस्था या तत्त्वांचे यामध्ये पालन केले जाते.

उदिष्टे : भारतातील ई - गव्हर्नन्स, सुशासन, डिजिटल शासन या अनुषंगाने फार कमी प्रमाणात अभ्यास झालेला दिसून येतो या मागील कारणाचा शोध घेणे.

गृहीतके : विकसित आणि विकसनशील देशांमध्ये कार्यक्षमता परिणामकारकता आणि पारदर्शकता येण्यासाठी प्रशासनात ई - गव्हर्नन्स प्रणाली डिजिटल इंडिया, सुशासन ची सुरुवात मोठ्या प्रमाणावर झालेली आसली तरी भारतात मात्र याकडे पाहिजे तशी प्रगती दिसत नाही.

**प्रशासन व सुशासनातील सुधारणा :**

ई - गव्हर्नन्स उपक्रमामुळे समाजातील विविध घटकांपर्यंत जलद आणि लवकर सुविधा पोहोचवण्यासाठी माहिती तंत्रज्ञानाचा उपयोग मोठ्या प्रमाणावर झालेला दिसून येतो. प्रशासनातील गतिमानता वाढण्यास मदत झाली त्याचबरोबर आर्थिक आणि सामाजिक विकासाच्या संधी मोठ्या प्रमाणावर उपलब्ध झाल्या. धोरण निर्मिती आणि निर्णय प्रक्रियेत जलदपणा आला या सर्व तंत्रज्ञानाच्या आधारे विकासात्मक योजना राबवून कमकुवत गटांना अधिक सक्षम कसे बनवता येईल याकडे पहिले जाते. यामुळे प्रशासनात पारदर्शकपणा व गतिमानता आलेली तर आहेच याशिवाय जो घटक अधिक वंचित आहे, त्या घटकापर्यंत योजना पोहोचण्यास या तंत्रज्ञानाचा मोठ्या प्रमाणावर हातभार लागलेला दिसून येतो.

**गरज :**

आजच्या स्पर्धेच्या गतिशील व माहितीप्रधान युगात प्रशासनात सुधारणा करणे गरजेचे झाले आहे याची काही प्रमुख कारणे पुढील प्रमाणे जनतेच्या अपेक्षांमध्ये वाढ प्रशासकीय कार्यांमध्ये विलंब भ्रष्टाचार व अपारदर्शकता सेवा देण्यात पुरविण्यात असमानता तंत्रज्ञानातील जलद प्रगती यासारख्या अनेक समस्यांवर उपाय म्हणून आपण ई-शासन व डिजिटल प्रशासनाकडे पाहू शकतो तसेच याचा अवलंब करण्यात येत आहे.

**ई - शासन (E-Governance) अर्थ व संकल्पना :**

ई - शासन प्रशासकीय कार्यक्षमतेच्या दृष्टीने आणि समाज कल्याणाच्या हेतूने हि संकल्पना प्रेरित आहे. "देवांग मेहता, म्हणतात ई-प्रशासन म्हणजे स्मार्ट गव्हर्मेंट होय स्मार्ट म्हणजे simple साधे moral नैतिक Accountable उत्तरदायी Responsive जबाबदार व transparent पारदर्शी प्रशासन होय.

ई-शासन म्हणजे माहिती व दळणवळण तंत्रज्ञानाचा (ICT) वापर करून शासनाच्या सर्व सेवा माहिती व निर्णय प्रक्रिया नागरिकांपर्यंत सुलभ वेगवान व पारदर्शक पद्धतीने पोहोचविणे होय ई- शासनाचे मुख्य घटक

1. G2C- शासन ते नागरिक सेवा
2. G2G- शासन ते शासन विभागातील समन्वय
3. G2B- शासन ते उद्योग व्यवसाय सुलभीकरण
4. G2E -शासन ते कर्मचारी कर्मचारी व्यवस्थापन

या सर्व माध्यमातून ई- शासन आपले कार्य व्यवस्थित पद्धतीने पार पाडत आहे याही पुढे जाऊन डिजिटल पद्धतीने प्रशासन कार्य करीत आहे.

डिजिटल प्रशासन संकल्पना वैशिष्ट्ये

डिजिटल प्रशासन ही शासनाची अधिक प्रगत अवस्था आहे .येथे फक्त संगणकीकरण नसते तर त्याही पुढे एक पाऊल कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) बिग डेटा, क्लाऊड, कम्प्युटिंग, ब्लॉक चेन, मोबाईल गव्हर्नन्स या सर्व गोष्टींचा वापर प्रशासनात करून प्रशासन अधिक स्मार्ट व प्रतिसाद - क्षम बनविले जाते. डिजिटल प्रशासनाची काही वैशिष्ट्ये सांगता येतील.

1. कागद विरहित प्रशासन
2. वेळ व खर्चाची बचत
3. नागरिक केंद्रित सेवा
4. निर्णय प्रक्रियेत अचूकता
5. डेटा आधारित धोरण निर्मिती या सर्व घटकांमुळे शासकीय कामकाजास गती मिळाली आहे

**भारतातील ईशासन व डिजिटल उपक्रम :**

भारत सरकारने प्रशासकीय सुधारणा करण्यासाठी अनेक महत्त्वपूर्ण डिजिटल उपक्रम राबवत आहे.

1. डिजिटल इंडिया अभियान
2. आधार प्रणाली
3. UMANG
4. डीजी लॉकर
5. ऑनलाइन सेवा (पासपोर्ट,पॅन, उत्पन्नाचे प्रमाणपत्र इत्यादी)
6. GEM पोर्टल
7. PFMS (Public Financial Management System) इत्यादी वरील उपक्रमामुळे शासन ते नागरिक यामधील अंतर कमी झाले आहे.

**डिजिटल वातावरणातील ई - शासन :**

बदलत्या काळात कोट्यावधी भारतीयांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी आलेल्या डिजिटल इंडिया या प्रकल्पाचे एक जुलै 2015 रोजी सुरुवात झाली शासन आपल्या दारी ही संकल्पना प्रत्यक्षात अमलात आणण्यासाठी डिजिटल इंडिया हा प्रकल्प मदत करीत आहे. हा प्रकल्प कार्यक्रम देशातील प्रत्येक गाव इंटरनेटची जोडण्याच्या उद्दिष्ट अशी संबंधित आहे. डिजिटल वातावरण म्हणजे इंटरनेट मोबाईल सोशल मीडिया व क्लाऊड आधारित प्रणालींनी निर्माण केलेले प्रशासनिक वातावरण होय या वातावरणात सेवा 24 तास उपलब्ध थेट संवाद रियल टाईम माहिती तक्रार निवारण सुलभ यामुळे लोकांचा सहभाग वाढतो व प्रशासन अधिक लोकशाही पूरक बनते.

**डिजिटल वातावरणातील ई - शासनासमोरील आव्हाने :**

डिजिटल प्रशासन हे खूप उपयुक्त असले तरी त्यात अनेक अडचणींचा सामना करावा लागतो.

1. डिजिटल दरी ग्रामीण शहरी भागातील इंटरनेट व तांत्रिक साधनातील तफावत
2. सायबर सुरक्षा डेटा चोरी हॅकिंग गोपनीयतेचा धोका
3. तांत्रिक साक्षरतेचा अभाव सामान्य नागरिक व कर्मचारी यांना तंत्रज्ञानाचा मर्यादीत वापर
4. पायाभूत सुविधांची कमतरता नेटवर्क वीज हार्डवेअरची अपुरी उपलब्धी

5. प्रशासकीय प्रतिकार बदल स्वीकारण्यास आणि इच्छा व पारंपारिक मानसिकता

**ई- शासनातील आव्हानांवरील उपाय :**

वरील अडचणींवर पुढील उपाय प्रभावी ठरू शकतात डिजिटल साक्षरता अभियान नागरिक व कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण दोन सायबर सुरक्षा धोरणे मजबूत कायदे व डेटा संरक्षण यंत्रणा तीन पायाभूत सुविधा विकास ब्रॉड बँड पाहिजे वीज पुरवठा चार लोकसहभाग वाढविणे फीडबॅक जनसुनावणी सोशल मीडिया संवाद पाच प्रशासकीय सुधारणा व प्रशिक्षण कर्मचाऱ्यांमध्ये सकारात्मक दृष्टिकोन निर्माण करणे.

**ई - शासन व सुशासनातील संबंध :**

ई - शासन हे सुशासनाचे एक प्रभावी साधन आहे ही शासनामुळे पारदर्शकता वाढते भ्रष्टाचार प्रमाण कमी होते एक निश्चित उत्तरदायित्व ठरते सेवा देण्याचा कल सुधारतो म्हणूनच सुशासनाच्या उद्दिष्ट पुरतींसाठी डिजिटल प्रशासन अनिवार्य व उत्तम पर्याय मानला जातो.

**निष्कर्ष :**

आधुनिक युगात प्रशासन अधिक सक्षम पारदर्शक व लोकाभिमुख बनविण्यासाठी ईशासन व डिजिटल प्रशासन काळाची गरज ठरत आहे तंत्रज्ञानाचे योग्य सुरक्षित व सर्व समावेशक वापर केल्यास प्रशासन व सुशासनातील सुधारणा प्रभावीपणे साध्य होऊ शकतात मात्र डिजिटल दरी सायबर सुरक्षा व तांत्रिक साक्षरता यासारख्या आव्हानांवर मात करणे ही तितकेच गरजेचे आहेत योग्य धोरणे प्रशिक्षण व लोकसहभागाच्या माध्यमातून भारतात डिजिटल सुशासनाचे मजबूत पायाभरणी निश्चितच होऊ शकते.

**समारोप :**

जगभरातील संपूर्ण प्रशासन प्रक्रियेत गतिमानता व पारदर्शकता यावी याकरिता जगातील सर्वात देशाने गव्हर्नन्स डिजिटल शासन या प्रमुख धोरणाकडे आपला मोर्चा वळवलेला दिसून येतो. ही प्रशासनातील एक सुधारित प्रक्रिया म्हणावी लागेल. इ गव्हर्नन्स म्हणजे उत्तम चांगले प्रशासन काम कायद्याच्या कार्यप्रक्रियेत अधिक गतिमानता घडवून आणण्यासाठी स्मार्ट शासन म्हणजेच साधा नैतिक जबाबदार प्रतिसादात्मक आणि पारदर्शक या संपूर्ण घटकाला स्मार्ट शासन असे म्हटले जाते हा प्रशासनातील एक नाविन्यपूर्ण शब्द जगात सर्वत्र वापरला जाऊ लागला आहे याचा फायदा जगातील विकसनशील देश सुद्धा या धोरणाकडे मोठ्या प्रमाणावर वळलेले दिसून येतात.

## संदर्भ सूची :

1. De Varies, M., (2013), 'The Challenge of Good Governance', The Innovation Journal, Vol. 18, Issue 1, 1-9.
2. Nagamatsu, T. And Tendon, H., (2004), 'E Governance initiatives in India: Citizens would rather be online than in line', United Nations.
3. देशमुख लक्ष्मीकांत (२०१८), 'सार्वजनिक प्रशासन', प्रथम आवृत्ती विद्या प्रकाशन, नागपूर.
4. World Bank report (1992), 'good governance', World Bank Publications, Washington D.C.
5. Governance and Development' (2015), Digital India Programme', अहवाल भारत सरकार दस्तऐवज.
6. जोशी अरुण (2016), 'ई- शासन आणि सार्वजनिक प्रशासन.विद्या प्रकाशन, नागपूर.
7. एम. लक्ष्मीकांत (2011), 'भारतीय प्रशासन', McGraw Hill Education, India.
8. IGNOU/YCMOU (2008), 'सार्वजनिक प्रशासन', अभ्यासक्रम साहित्य, (YCMOU) नाशिक.
9. विळेगावे व्यंकटेश, (२०14), 'भारतीय प्रशासन', क्रिएटिव्ह पब्लिकेशन्स नांदेड.

**Publisher's Note:** *The views and opinions expressed in this article are solely those of the author(s) and do not necessarily reflect those of the publisher, editors, or the editorial board.*